## जोडपत्र - 2

## संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

**विभागाचे नाव- महिला व बाल विकास विभाग**

**कार्यालयाचे नाव :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना**

**सेवेचे नाव :- बेबी केअर किट योजना**

| | | |
|---|---|---|
| 1. | योजनेचा संक्षिप्त तपशील | प्रसुतीनंतर जन्माला येणा-या नवजात बालकांना आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन तसेच नवजात बालकांचे बालमुत्युचे प्रमाण कमी करणेसाठी राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/ शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणाऱ्या नवजात बालकांना पहिल्या प्रसुतीच्या वेळी मुलगा किंवा मुलगी जन्मल्यानंतर त्यांना मोफत शासनातर्फे बेबी केअर कीट बॅग उपलब्ध करुन देणेबाबतची योजना दि. 29/12/2018 पासून सुरु करण्यात आलेली असून या योजनेची अंमलबजावणी राज्यात सन 2019-20 या वर्षापासून या विभागामार्फत करण्यात येत आहे. शासन निर्णय दिनांक 26/08/2025 अन्वये दुस-या प्रसुतीच्या वेळी देखील त्यांच्या नवजात बालकांसाठी (मुलगा किंवा मुलगी) बेबी केअर किट उपलब्ध करून देण्यास मान्यता दिलेली आहे.<br><br>बेबी केअर किट मध्ये (1) लहान मुलांचे कपडे (2) प्लास्टीक लंगोट (3) लहान मुलांची झोपण्याची लहान गादी (4) लहान मुलांचे टॉवेल (5) ताप मापन यंत्र इलेक्टॉनिक्स थर्मामिटर (6) मच्छरदाणी (७) लहान मुलांसाठी गरम ब्लँकेट (८) लहान चटई प्लास्टीक (9) लहान मुलांची खेळणी- खुळखुळा (10) लहान मुलांची नखे काढण्यासाठी नेलकटर (11) लहान मुलांसाठी हातमोजे व पायमोजे (12) लहान मुलाला बांधुन ठेवण्यासाठी कापड/ आईसाठी लोकरीचे कापड इ. साहित्याचा समावेश आहे. |
| 2. | योजनेच्या पात्रतेचे निकष | बेबी केअर कीट उपलब्ध करुन देण्याची कार्यपध्दती/शर्ती अटी पुढीलप्रमाणे राहतील.<br><br>1. राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र / शासकीय रुग्णालयात गरोदरपणाची नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणा-या महिलांना पहिल्या तसेच दुस-या प्रसुतीच्या |

| | | |
|---|---|---|
| | | वेळी त्यांच्या नवजात बालकांसाठी (मुलगा किंवा मुलगी) बेबी केअर किट उपलब्ध करून देण्यात येत आहे.<br>2. सदर योजनेचा लाभ मिळण्याकरिता अंगणवाडी केंद्रात व शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र / शासकीय रुग्णालयात नाव नोंदणी करणे अनिवार्य राहील.<br>3. त्यानुसार नाव नोंदणी शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र / शासकीय रुग्णालयात करण्यात आलेली आहे. परंतु, अपवादात्मक परिस्थितीत खाजगी रुग्णालयात काही कारणास्तव प्रसुतीसाठी दाखल केलेले लाभार्थी या योजनेस पात्र राहतील.<br>4. ज्या गरोदर महिलांची प्रसुतीपूर्वी सासरच्या ठिकाणी अंगणवाडी केंद्रात व शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र /शासकीय रुग्णालयात नोंद आहे, परंतु, त्या प्रसुतीसाठी माहेरी आलेल्या असतील, अशा महिलांना सासरच्या ठिकाणच्या संबंधित अंगणवाडी सेविकेच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे माहेरच्या ठिकाणच्या अंगणवाडी केंदामधुन वेवी केअर किटचा लाभ अनुज्ञेय राहील.<br>5. बेबी केअर कीट योजना समाजातील सर्व घटकातील लाभार्थ्यांना लागु राहील.<br>6. गरोदर असताना शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र / शासकीय रुग्णालयात नाव नोंदणी केलेले लाभार्थी या योजनेस पात्र रहातील.<br>7. शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/शासकीय रुग्णालयात नाव नोंदणी केलेल्या महिलेने गरोदरपणी 9 व्या महिन्यात जवळच्या अंगणवाडी केंद्रात अंगणवाडी सेविकेला माहिती /अर्ज दिल्यानंतर अंगणवाडी सेविकेकडून सबधित लाभार्थ्यांना बेबी केअर कीट बॅग उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>8. एखादी महिला प्रसुती झाल्यानतर तीने (2 महिन्याच्या आत) बेबी केअर कीटसाठी अर्ज सादर केल्यास तिला बेबी केअर कीट उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>9. बाल विकास प्रकल्प अधिकारी ग्रामीण/नागरी यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यापासून 3 दिवसात बेवी केअर कीट बॅग लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>10. प्रत्येक प्रकल्पस्तर व अंगणवाडीस्तरावर बेबी केअर कीट मागणीच्या अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. |

| | | |
|---|---|---|
| 3. | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | 1. बेबी केअर किट मागणीचा विहित नमुन्यात अर्ज<br>2. आधारकार्ड<br>3. अंगणवाडीमध्ये व शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र / शासकीय रुग्णालयात नाव नोंदणी दाखला<br>4. जिथे प्रसुती झालेली आहे त्या शासकीय रुग्णालयाचे/प्रसुतीगृहाचे प्रसुती झाल्याबाबतचे वैद्यकीय कागदपत्र<br>5. नाव नोंदणी शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र / शासकीय रुग्णालयात करण्यात आलेली आहे. परंतु, अपवादात्मक परिस्थितीत खाजगी रुग्णालयात काही कारणास्तव प्रसुती झाली असल्यास त्याबाबतची वैद्यकीय कागदपत्र |
| 4. | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | ऑनलाईन सूविधा नाही. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या बाल विकास प्रकल्पस्तर व अंगणवाडीस्तरावर बेबी केअर कीट मागणीच्या अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. त्यानुसार अर्ज करावयाचा आहे. |
| 5. | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | लागू नाही. |
| 6. | शुल्क भरण्याची पध्दत | - |
| 7. | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | प्रकल्पस्तर/ अंगणवाडीस्तरावर बेबी केअर किट बॅग उपलब्ध असल्यास अर्ज प्राप्त झाल्यापासून 3 दिवसांच्या आत. |
| 8. | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| 9. | योजने संदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | ग्रामीण प्रकल्पाच्या बाबतीत जिल्हा कार्यक्रम अधिकारी( महिला व बाल विकास),<br><br>नागरी प्रकल्पाच्या बाबतीत विभागीय उपआयुक्त (महिला व बाल विकास) |

**विभागाचे / कार्यालयाचे नाव :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना**

**योजनेचे नाव :-लेक लाडकी योजना**

| | | |
|---|---|---|
| 1. | योजनेचा संक्षिप्त तपशील | शासन निर्णय दिनांक 30 ऑक्टोबर 2023 अन्वये राज्यात मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी ही योजना सुरु करण्यात आली, असून सदर योजनेचा शुभारंभ हा दिनांक 12.01.2024 रोजी करण्यांत आलेला आहे, या योजनेचा प्रमुख उददेश हा मुलींचे सक्षमीकरण करणे हा आहे. या योजनेअंतर्गत मुलींना वयाच्या 18 वर्षापर्यंत विविध टप्प्यावर पिवळया व केशरी रेशन कार्डधारक कुटुंबात मुलींच्या जन्मानंतर अनुदान देण्यात येणार आहे. मुलींचे वय हे 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला 75 हजार रुपये असे एकूण 1,01,000/- एवढी रक्कम देण्यात येईल.<br>**<u>लाभाचे स्वरुप :-सदर</u>** योजनेअंतर्गत आवश्यक अटी शर्ती व कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर पिवळया व केशरी शिधा पत्रिकाधारक कुटुंबात जन्मलेल्या मुलींसाठी.<br>मुलींना जन्मानंतर **5 हजार रुपये**<br>इयत्ता पहिलीत **6 हजार रुपये**<br>सहावीत **7 हजार रुपये,**<br>अकरावीत **8 हजार रुपये**<br>**18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला 75 हजार रुपये.**<br><br>**एकूण रुपये 1,01,000/- एवढी रक्कम देण्यात येईल.** |
| 2. | योजनेच्या पात्रतेचे निकष | 1. ही योजना पिवळया व केशरी शिधा पत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक 1 एप्रिल 2023 रोजी वा त्यानंतर जन्माला येणा-या एक अथवा दोन मुलींना लागू राहील. तसेच एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.<br>2. पहिल्या अपत्याच्या तिस-या हप्त्यासाठी व दुस-या अपत्याच्या दुस-या हप्त्यासाठी अर्ज सादर करते वेळी माता / पित्याने कुटुंबनियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.<br>3. तसेच दुस-या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र त्यानंतर माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्र क्रिया करणे आवश्यक राहील.<br>4. दिनांक 1 एप्रिल 2023 पूर्वी एक मुलगी / मुलगा आहे व त्यानंतर जन्माला आलेल्या दुस-या मुलीस किंवा जुळया मुलींना (स्वतंत्र) ही योजना अनुज्ञेय राहील. मात्र माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील. |

| | | |
|---|---|---|
| | | 5. लाभार्थीचे कुटंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक राहील.<br>6. लाभार्थीचे बँक खाते असणे आवश्यक आहे.<br>7. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.1 लक्ष पेक्षा जास्त नसावे. |
| 3. | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | 1. लाभार्थीचा जन्माचा दाखला.<br>2. कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न 1 लाखापेक्षा जास्त नसावे.) याबाबत तहसिलदार / सक्षम अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.<br>3. लाभार्थीचे आधार कार्ड (प्रथम लाभावेळी ही अट शिथील राहील.)<br>4. पालकाचे आधार कार्ड.<br>5. बँकेच्या पास बुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.<br>6. रेशनकार्ड (पिवळे अथवा केशरी रेशनकार्ड साक्षांकित प्रत)<br>7. मतदान ओळखपत्र ( शेवटच्या लाभाकरीता 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर मुलींचे मतदार यादीत नाव असल्यास दाखला )<br>8. संबंधित टप्प्यावरील लाभाकरीता शि क्षण घेत असल्याबाबतचा संबंधित शाळेचा दाखला (Bonafide)<br>9. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्र ("अ" येथील अटी शर्तीमधील क्रमांक 2 येथील अटीनुसार)<br>10. अंतिम लाभाकरीता मुलीचा विवाह झालेला नसणे आवश्यक राहील. (अविवाहित असल्यास लाभार्थीचे स्वयं घोषणापत्र) |
| 4. | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | lly.mhicds.com हे संकेतस्थळ असून अर्जदाराकडून ऑफलाईन अर्ज घेऊन ते पर्यवेक्षिका / मुख्यसेविकांमार्फत ऑनलाईन भरण्यात येतात. |
| 5. | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | निरंक |
| 6. | शुल्क भरण्याची पध्दत | निरंक |
| 7. | अर्ज निकाली काढावयाचा कालावधी | अर्जाची छाननी व मंजुरीकरिता 60 दिवस ( निधीच्या उपलब्धतेनुसार लाभ अदा करण्यात येतो) |
| 8. | योजना मंजूरी कालावधी | निधी उपलब्धतेनुसार |
| 9. | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी(म. बा. वि) तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्या बाबतीत नोडल अधिकारी |
| 10. | योजने संदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | विभागीय उप-आयुक्त (महिला व बाल विकास विभाग) |

**विभागाचे नाव - महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

**कार्यालयाचे नाव :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना**

**योजनेचे नाव - प्रधानमंत्री मातृवंदना योजना (PMMVY)**

| | | |
|---|---|---|
| 1. | योजनेचा संक्षिप्त तपशील | भारतातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत शारीरीक क्षमता नसतानाही मजूरीसाठी काम करावे लागते. त्यामुळे देशातील गर्भवती माता व बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन माता व बालमृत्यू दरात वाढ झाल्याने ते नियंत्रित करण्यासाठी दि. 1 जानेवारी, 2017 पासून प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरू करण्यात आली आहे. |
| 2. | योजनेच्या पात्रतेचे निकष | 1. प्रथम अपत्यासाठी (First Child)<br>• पात्रता: पहिल्या प्रसूतीसाठी गरोदर असलेल्या सर्व महिला.<br>2. दुसऱ्या अपत्यासाठी (Second Child - फक्त मुलगी असल्यास)<br>• पात्रता: जर दुसरे अपत्य मुलगी असेल, तरच या योजनेचा लाभ मिळतो. ही तरतूद मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आली आहे.<br>3. इतर महत्त्वाचे निकष<br>• लाभार्थीचे वय शेवटच्या मासिक पाळीच्या दिवशी किमान 18 वर्षे 7 महिने व कमाल 55 वर्षे या दरम्यान असावे. (पोर्टलमध्ये लाभार्थीची नोंद किमान 18 वर्षे 7 महिने व कमाल 55 वर्षे दरम्यान वय असेल तरच होऊ शकते.)<br>• कामाचे स्वरूप: ही योजना प्रामुख्याने असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी आहे.<br>• अपवाद: वेतनासह मातृत्व रजा (180 दिवस रजा) मिळणा-या महिलांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. (केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये नियमित सेवेत असलेल्या सर्व गर्भवती महिला आणि स्तनदा माता किंवा सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत समान लाभ मिळवणाऱ्या महिलांना PMMVY अंतर्गत लाभ देय नाही.<br>• नोंदणी: लाभार्थीने विहित कालावधीत शासकीय आरोग्य संस्थेत गर्भधारणेची नोंदणी करणे आवश्यक आहे.<br>• लाभ देण्याची कालमर्यादा- पहिल्या अपत्यासाठी शेवटच्या मासिक पाळीच्या (LMP) दिनांकापासून 570 दिवस आहे. तर |

| | | |
|---|---|---|
| | | दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्माच्या तारखेपासून 270 दिवसांपर्यंत देण्यात यावा. |
| 3. | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | खालील पैकी कोणतेही 1 कागदपत्र<br><br>1. निव्वळ कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रु.8 लाख पेक्षा कमी असल्याबाबतचे प्रमाणपत्र .<br>2. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिलांच्या बाबतीत जातीचा दाखला.<br>3. 40% व अधिक अपंगत्व असणा-या (दिव्यांग जन) महिलांच्या बाबतीत अंपगत्वाचे विहित प्रमाणपत्र<br>4. बीपीएल शिधापत्रिका.<br>5. आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे (PMJAY) कार्ड.<br>6. ई-श्रम कार्ड<br>7. किसान सन्मान निधी कार्ड<br>8. मनरेगा जॉब कार्ड<br>9. गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका (AWW)/अंगणवाडी मदतनीस (AWHs)/आशा कार्यकर्ती (ASHAs). ओळखपत्र<br>10. अन्न सुरक्षा कायदा, 2013 अंतर्गत लाभ घेत असल्याबाबत रेशनकार्ड. |
| 4. | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | pmmvy.wcd.gov.in |
| 5. | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | लागू नाही. |
| 6. | शुल्क भरण्याची पध्दत | - |
| 7. | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | केंद्र शासनाने कालावधी विहित केलेला नाही. |
| 8. | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | SO (Sanctioning Officer) बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| 9. | योजने संदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | जिल्हा कार्यक्रम अधिकारी ( महिला व बाल विकास), संबंधित जिल्हा परिषद. |

**विभागाचे नांव :- महिला व बाल विकास**

**कार्यालयाचे नांव :- महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1**
**योजनेचे नांव :- पिंक (गुलाबी) ई-रिक्षा**

| | | |
|---|---|---|
| 1 | योजनेचे संक्षिप्त तपशील | राज्यातील महिला व मुलींना रोजगार निर्मीतीस चालना देणे, त्यांना आर्थिक स्वावलंबन करणे तसेच महिला व मुलींना सुरक्षित प्रवास करणे यासाठी नोकरी तसेच रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध असलेल्या पुणे, नाशिक, नागपुर, अहमदनगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापुर व सोलापुर या 08 जिल्ह्यांतील प्रमुख शहरांतील सर्व भागामध्ये इच्छुक व पात्र महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थ सहाय्य व चालविण्यासाठी इतर सोई सुविधा उपलब्ध करून देणे. |
| 2 | योजनेच्या पात्रतेचे निकष | 1. विधवा, कायद्याने घटस्फोटीत, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनुरक्षणगृह आजी- माजी व बालगृहातील माजी प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्र प्राप्त महिला यांना प्राधान्य.<br>2. शिक्षण : किमान 10 वी पास,<br>3. वय : 20 ते 40 वर्ष असावे.<br>4. महिला कुटंबाचे वार्षिक उत्पन्न 3 लाखपर्यंत असावे. तसेच दारिद्रय रेषेखालील महिलांना प्राधान्य राहिल.<br>5. रिक्षाच्या किमतीच्या 10% रक्कम भरण्याची तयारी असावी.<br>6. बँकेचा 70% कर्जाचा हप्ता 5 वर्षामध्ये भरण्याची तयारी असावी.<br>7. पात्र लाभार्थ्यंना रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण परिवहन विभागाने निश्चीत केलेल्या अधिकृत संस्थेकडून घ्यावे लागेल.<br>8. पिंक रिक्षाचे चालक फक्त महिलाच असेल. पुरुषांनी पिंक रिक्षा चालविल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.<br>9. शासन योजनेच्या अटीशर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्रे देणे बंधनकारक राहिल. |
| 3 | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | 1. योजनेच्या लाभासाठी फॉर्म<br>2. लाभार्थ्याचे आधारकार्ड व पॅनकार्ड<br>3. कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला (3 लाखा पेक्षा कमी असावे)<br>4. बँक खाते पासबुक |

| | | |
|---|---|---|
| | | 5. पासपोर्ट आकाराचा फोटो<br>6. चालक परवाना<br>7. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला , मतदार ओळखपत्र (15 वर्षापुर्वीचे असावे), रेशनकार्ड (पिवळे / केशरी) (महिलेचे 15 वर्षापुर्वीचे असावे), शाळा सोडल्याचा दाखला 15 वर्षापूर्वीचा असावा. यापेकी कोणतेही एक ओळखपत्र/ प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात यावे.<br>8. सदर रिक्षा महिला लाभार्थी यांनीच चालविणार असल्याचे हमी पत्र<br>9. शासन योजनेच्या अटीशर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र |
| 4 | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | निरंक |
| 5 | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | निरंक |
| 6 | शुल्क भरण्याची पध्दत | जागू नाही |
| 7 | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | साधारणपणे 2 महिने |
| 8 | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती |
| 9 | योजने संदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी | संबंधित विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास |